MCAER
कृषि परिषद

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७

mcaer@rediffmail.com ०२०-२५५२८२०८ www.mcaer.org

जा.क्र.मकृप/शिक्षण-१/६५१८/६४७/२६९५ दि.१९/०८/२०२६

प्रति,

**कुलसचिव,**
चारही कृषि विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

**विषय : दि.१७ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित राज्यव्यापी "रोजगार महाकुंभ" मध्ये कृषि विद्यापीठ व कृषि महाविद्यालय यांचा सहभाग सुनिश्चित करण्याबाबत.**

**संदर्भ :** श्री मंगलप्रभात लोढा यांचे दि.१८/०८/२०२६ रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये श्री मंगलप्रभात लोढा यांनी दि.१७ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित राज्यव्यापी "रोजगार महाकुंभ" मध्ये कृषि विद्यापीठ व कृषि महाविद्यालयांचा सहभाग सुनिश्चित करण्याबाबत मा. मंत्री (कृषि) तथा अध्यक्ष कृषि परिषद यांना विनंती केली आहे. सदर पत्रावर मा. मंत्री (कृषि) यांनी "महासंचालक एम. सी. ए. ई. आर. पुणे अ अनुषंगाने तातडीने कार्यवाही करावी." असे निर्देश दिले आहेत.

तदनुषंगाने, मा. मंत्री (कृषि) यांचे निर्देशास अनुसरुन, राज्यातील चारही कृषि विद्यापीठे व त्याअंतर्गत कृषि महाविद्यालये यांना या "रोजगार महाकुंभ" ची माहिती देवून पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांचा त्यामध्ये सहभाग सुनिश्चित करावा सदर मेळाव्यामध्ये सहभागी होण्यासाठी महाविद्यालयांसाठी सोबत जोडलेल्या पत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे Google Form उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

यास्तव विद्यापीठांतर्गत सर्व महाविद्यालयांना उक्त मेळाव्यामध्ये सहभाग नोंदविण्यासाठी आपले स्तरावरुन कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीबाबत या कार्यालयास अवगत करण्यात यावे तसेच अधिकाधिक युवकांना त्यांच्या कौशल्याला अनुरुप रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी अशा प्रकारचे "रोजगार महाकुंभ" विद्यापीठस्तरावर देखील आयोजित करण्यात यावे.

**सोबत :** वरीलप्रमाणे.

Dy. R. Estt / Gad./ Acad.

O/o Registrar
No. R/1406
Date 19/8/26
Dr. P.D.K.V., AKOLA

19.8.2026
(राहुल महिवाल, भाप्रसे)
**महासंचालक**
**कृषि परिषद, पुणे**

20/8/2026
SOC(B)
Send to DSW/Library
ARIS Cell.
21/08/2026

**प्रत :** १. संचालक शिक्षण, चारही कृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य यांना माहितीस्तव व संबंधितांना सूचनेस्तव.
२. मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव यांना माहितीस्तव.

332
4 Agril. University - 2

**कार्यालय**
**उपकुल सचिव (आस्था)**
**आवक विभाग** 6-239
**डॉ. पं. दे. कृ. वि. अकोला** 21/08/26



मंत्री 0595/2025

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in

दिनांक 18 AUG 2025

नमस्कार

**विषय:- दि.१७ सप्टेंबर २०२५ रोजी आयोजित राज्यव्यापी "रोजगार महाकुंभ" मध्ये कृषी विद्यापीठ व कृषी महाविद्यालये यांचा सहभाग सुनिश्चित करण्याबाबत.**

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान मा.श्री.नरेंद्र मोदीजी यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून आणि त्यांनी नेहमी जपलेल्या "युवाशक्ती हीच राष्ट्रशक्ती" या संकल्पनेला अनुसरून, राज्यातील प्रत्येक युवकाच्या हाताला काम मिळावे आणि त्याचे स्वप्न त्याच्याच गावात, तालुक्यात पूर्ण व्हावे, या भावनेतून कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत दि. १७ सप्टेंबर २०२५ रोजी संपूर्ण राज्यात एकाच दिवशी, एकाच वेळी ५०० केंद्रांवर **रोजगार महाकुंभ** (रोजगार मेळावे व प्लेसमेंट ड्राइव्ह) आयोजित करण्यात येत आहेत.

उद्योग व सेवा क्षेत्रातील मनुष्यबळाची आवश्यकता निश्चित करून Vacancy Mapping करण्यात येत असून, त्यानुसार योग्य उमेदवारांना या **रोजगार महाकुंभमध्ये** प्राधान्याने सहभागी करून घेण्यात येणार आहे. त्यासाठी आवश्यकतेनुसार उमेदवारांना शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमार्फत ७ दिवसांचे प्रशिक्षणही देण्यात येणार आहे.

या पार्श्वभूमीवर, आपल्या विभागामार्फत राज्यातील सर्व कृषी विद्यापीठे व कृषी महाविद्यालये यांना या **रोजगार महाकुंभची** माहिती देऊन पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांचा त्यामध्ये सहभाग सुनिश्चित करण्याबाबत तसेच असे **रोजगार महाकुंभ** आयोजित करणे बाबत आवश्यक ते निर्देश देण्यात यावेत, अशी विनंती आहे. यासाठी आवश्यक ते सहकार्य कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाकडून देण्यात करण्यात येईल.

या मेळाव्यात सहभागी होण्यासाठी महाविद्यालयांसाठी पुढील Google Form उपलब्ध करून देण्यात आलेला आहे: https://forms.gle/P8wCZXSKuxcg4Veb9

आपल्या निर्देशामुळे अनेक महाविद्यालयातील अनेक युवकांना त्यांच्या कौशल्याला अनुरूप रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यास मदत होईल. अशा या **राज्यव्यापी रोजगार महाकुंभचे** ऑनलाइन उद्घाटन मा.श्री. देवेंद्रजी फडणवीस, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते करण्यात येणार आहे, आपले सहकार्य लाभावे, ही विनंती.

धन्यवाद

(मंगलप्रभात लोढा)

प्रति,
मा.ना.श्री. दत्ता मामा भरणे जी,
मा. मंत्री, कृषी, महाराष्ट्र राज्य.

कार्यालय पत्ता : दालन क्र. २०२, २रा मजला (मुख्य इमारत), मंत्रालय, मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.
दूरध्वनी क्र. : ०२२-२२०२ ५३०८/२२०२ ४५३२, ई-मेल : min.skills@maharashtra.gov.in